शनिवार, दि. १८ ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ५९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना मनपा लाचकांडानंतर प्रशासन ठप्प

## एसीबी कारवाईनंतर मनपा कर्मचाऱ्यांचा पोलीस ठाण्याकडे ओघ, 'त्या' अधिकाऱ्यांचीही चौकशी व्हावी

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दहा लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडल्याने शहरात आणि मनपात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणानंतर मनपाचे दैनंदिन कामकाज ठप्प झाले असून, कार्यालयात अधिकाऱ्यांपेक्षा सदर बाजार पोलीस ठाणे आणि न्यायालय परिसरात मनपा कर्मचारी व काही मर्जीतील ठेकेदार दिसत असल्याचे दृश्य शुक्रवार (दि १७) रोजी दिवसभर पाहायला मिळाले.

माहितीनुसार, मनपातील कामांचे बिल काढण्यासाठी दहा लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून आयुक्त खांडेकर यांच्याविरुद्ध एसीबीने कारवाई केली. गुरुवारी रात्री एसीबीच्या पथकाने त्यांच्या घरी सापळा रचून त्यांना रोकड रकमेसह अटक केली. या कारवाईनंतर प्रशासनात मोठा भूकंप झाला असून, कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. संपूर्ण कारवाईत पाच लाख वीस हजार रुपये कॅश, २० तोळे ५ ग्रम सोने, २ किलो ७७० ग्रॅम चांदी असा मुद्देमाल तसेच प्रॉपर्टी संदर्भातील व ईतर कागदपत्रे एसीबीने ताब्यात घेतली आहे.

लाचकांड उघड झाल्यानंतर मनपा कर्मचाऱ्यांचा व मर्जीतील ठेकेदारांचा वावर सदर बाजार पोलीस ठाणे, एसीबी कार्यालय आणि कोर्ट परिसरात सतत पाहायला मिळत आहे. शहरात चर्चा रंगली आहे की, मनपाचे अधिकारी आणि काही ठेकेदार आरोपी आयुक्तांना भेटण्यासाठी किंवा चौकशीची माहिती मिळवण्यासाठी धाव घेत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारींचे निपटारे, बांधकाम परवानग्या, बिल प्रक्रिया, कर वसुली यांसारखी अनेक कामे पूर्णपणे ठप्प झाली आहेत.

लाच प्रकरणातील तपास एसीबीकडे असून, त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. नागरिकांनी आणि काही सामाजिक संस्थांनी एसीबी अधीक्षकांनी सदर बाजार पोलीस ठाणे व न्यायालय परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासावे, जेणेकरून कोणते मनपा अधिकारी- कर्मचारी आणि ठेकेदार आरोपी आयुक्तांना भेटायला गेले होते, हे स्पष्ट होईल, अशी मागणी होत आहे.

मनपा कर्मचारी आणि अधिकारी पोलीस ठाण्याकडे तसेच न्यायालयात वळल्याने नागरिकांना मनपा कार्यालयात तासन तास थांबावे लागले, तरीही कोणीही उत्तर देणारे नव्हते.

**'सांगोला ते जालना; आयुक्त लुटायला आले'**

सांगोला येथील रहिवासी असलेले आयुक्त खांडेकर जालन्यात मनमानी कारभार करत होते. यापुर्वी ते जालना नगर पालिकेत मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. तेथून त्यांची बदली झाल्यानंतर पुन्हा ते मुख्याधिकारी म्हणून रुजू झाले. मध्यंतरी नगर परिषदेचे जालना शहर महानगर पालिकेत रुपांतर झाले. तेथे ही ते आयुक्त म्हणून कामकाज पाहत होते. त्यांच्या कार्यकाळात मुख्याधिकारी असतांनाही आणि आयुक्त असतांनाही बरेच आरोप झाले. आता या लाच प्रकरणाने या सर्व घटनांवर शिकामोर्तब झाले आहे.

त्यामुळे सांगोल्याचे रहिवासी असलेले आयुक्त हे काय तेथून येऊन जालना लुटण्यासाठीच आले की काय? अशी चर्चा रंगू लागली आहे.



**निलंबनाची मागणी आणि लेखा विभागावर संशय**

शहरातील सामाजिक संस्था, नागरिकांनी आयुक्त संतोष खांडेकर यांना तत्काळ निलंबित करण्याची मागणी केली आहे. तसेच, लाच प्रकरण फक्त एका व्यक्तीपुरते मर्यादित नसून मनपातील ईतर विविध विभागातील बांधकाम, मालमत्ता, आरोग्य, पाणी पुरवठा यासह लेखा विभागातील काही अधिकारी आणि कर्मचारी यांचाही या व्यवहारात सहभाग असू शकतो, अशी शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे संपूर्ण विभागासह लेखा विभागाची चौकशी करावी, अशी मागणीही जोर धरत आहे.

**'मनपाला खमक्या आणि पारदर्शक आयुक्ताची गरज'**

लाचकांडानंतर जालना महानगरपालिकेच्या प्रशासनावर नागरिकांचा विश्वास ढासळला आहे. मनपामध्ये भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांचा विश्वास परत मिळवण्यासाठी खमक्या, प्रामाणिक आणि जनसंपर्कशील आयुक्ताची तातडीने नेमणूक करण्याची गरज आहे, असे सर्वसामान्य नागरिकांचे मत आहे.

## महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांना एक दिवसाची पोलिस कोठडी; पुढील सुनावणी शनिवारी

जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांना दहा लाख रुपयांची लाच घेतल्याच्या आरोपावरून एका दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्याचे आदेश तिसरे जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. बी. पारवेकर यांनी आज शुक्रवार (दि. १७ ऑक्टोबर) रोजी दिले. या निर्णयामुळे संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरलेल्या या प्रकरणाची पुढील सुनावणी शनिवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. सुनावणीदरम्यान जिल्हा न्यायालय परिसरात नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. या प्रकरणातील घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले होते.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक बी. एस. जाधवर आणि निरीक्षक शरदचंद्र रोडगे यांनी आरोपी खांडेकर यांना दुपारी न्यायालयात हजर केले. सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील अ‍ॅड. बाबासाहेब इंगळे यांनी बाजू मांडली. त्यांनी न्यायालयाला सांगितले की, तपास अद्याप सुरू असून आरोपीच्या बंगल्यावर घेतलेल्या घरझडतीदरम्यान रु ५,२०,००० रोकड सापडली आहे.

तसेच आरोपीच्या मोबाईल फोनमधील संभाषणांबाबत आणि सध्या बंद असलेल्या मोबाईलच्या संदर्भात सखोल तपास करण्याची आवश्यकता असल्याने ५ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली. सरकार पक्षाच्या वकिलांनी सांगितले की, हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असून तपास पूर्णपणे व निष्पक्ष व्हावा, अन्यथा जनतेत चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, आरोपी खांडेकर यांच्या वकिलांनी अटक बेकायदेशीर असल्याचा दावा न्यायालयात मांडला. त्यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील संबंधित कलमाचा हवाला देत सरकार पक्षाने अटकेदरम्यान आवश्यक प्रक्रिया न पाळल्याचा आरोप केला. त्यासाठी त्यांनी 'विहान कुमार विरुद्ध हरियाणा सरकार' या खटल्याचा दाखला देत आरोपीला तत्काळ मुक्त करण्याची मागणी केली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीश आर. बी. पारवेकर यांनी सायंकाळी आदेश देतांना आयुक्त संतोष खांडेकर यांना एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली.

पुढील सुनावणी शनिवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी होणार असून त्या वेळी तपासातील पुढील बाबी न्यायालयासमोर मांडल्या जाणार आहेत.

युवा आदर्श

### नव धन्वंतरी...

समुद्र मंथनी उत्पत्ती
देवांचा वैद्य धन्वंतरी
आरोग्य देई सकळा
अमृतकुंभ तया करी
रूप घेवून डॉक्टरांचे
देवदूत येई धरतीवरी
धन तेरस निमीत्ताने
जयंती करू साजरी
संकट नवे जगावरी
कोरोनाची महा मारी
रूपनवीन डॉक्टरांचे
जाणवले ते परोपरी
परिश्रमे तया केवळ
दिवाळी हो घरो घरी
उपकार मानू किती
आरोग्य देई खरोखरी
नाम घेऊनि धन्वंतरी
दीप एक लाऊ दारी
सर्वे संतु: निरामय :
रात्र नको ती अंधारी
आरोग्य जागृती यावी
प्रकाश उजळो अंतरी
सुख समृद्धीची खात्री
निरंतर देई धन्वंतरी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## वरद ज्वेलर्सचे आज उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** मंठा शहरातील सुवर्ण व्यवसायात आपली विश्वासाई ओळख निर्माण केलेले 'गणेश ज्वेलर्स' आता जालना शहरात दाखल होत आहेत. येत्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर चंदनझिरा येथील मातोश्री चौक, बजरंग रोड येथे 'वरद ज्वेलर्स'ची भव्य नवीन शाखा आज शनिवार (दि. १८) रोजी दुपारी १२.४५ वाजता सुरू होत आहे.



उद्घाटन समारंभाचा शुभमुहूर्त आश्विन कृष्ण नवमी निमित्त घेण्यात आला असून या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प. गुरुवर्य भगवानबाबा आनंदगडकर हे उपस्थित राहणार आहेत.

विश्वास हीच परंपरा या ब्रीदवाक्याखाली ग्राहकांची निष्ठा जपणारे वरद ज्वेलर्सचे संस्थापक सुधाकर भिमराव खरात आणि सार्थक सुधाकर खरात यांनी सांगितले की, मंठा शहरात 'श्री गणेश ज्वेलर्स'च्या माध्यमातून आम्ही अनेक वर्षे ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे. आता जालना शहरातील नागरिकांनाही शुद्ध सोने, चांदी आणि उत्कृष्ट डिझायनिंग असलेले दागिने योग्य दरात मिळावेत, हा आमचा उद्देश आहे. चंदनझिरा परिसर व्यापारी दृष्ट्या महत्वाचा असून, येथील ग्राहकांना आमचा 'विश्वास' नक्कीच भावेल.

वरद ज्वेलर्सच्या या शाखेत २२ आणि २४ कॅरेट सोन्याचे दागिने, चांदीच्या आकर्षक वस्तू, तसेच नववधूसाठी खास ब्रायडल कलेक्शन उपलब्ध असणार आहे. यासोबतच डिझायनर नेकलेस सेट, नवनवीन मंगळसूत्र डिझाईन्स, लहान मुलांसाठी खास कलेक्शन आणि चांदीच्या भेटवस्तूंची विशेष मालिकाही ग्राहकांना पाहायला मिळणार आहे.

ग्राहकांच्या सोयीसाठी विश्वासार्ह बिलिंग प्रणाली, सोने चाचणी यंत्र, आणि विशेष दिवाळी ऑफर्सही उपलब्ध असतील.

उद्घाटन सोहळ्यासाठी मातोश्री चौक परिसरात सुंदर सजावट, आकर्षक निमंत्रण फलक आणि पारंपरिक मंगल वातावरणाची तयारी करण्यात आली आहे. स्थानिक नागरिक, व्यापारी वर्ग आणि महिला ग्राहकांमध्ये या नव्या शाखेबाबत उत्सुकता दिसून येत आहे.

दिवाळीच्या शुभारंभी, विश्वासाची नवपरंपरा सुरू करणारे 'वरद ज्वेलर्स' जालना शहराच्या सुवर्ण विश्वात नवा अध्याय उघडत आहेत.

## गॅस सिलेंडर डिलीव्हरी करणाऱ्या व्यक्तींनी अतिरिक्त पैसे मागितल्यास कारवाई करण्याचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** सद्या सर्वत्र सण आणि उत्सावाचे दिवस सुरु असुन, या कालावधीत स्वयंपकाच्या गॅस सिलेंडरची मागणी वाढत असते. परंतू स्वयंपाकाचे गॅस एजन्सीमार्फत गॅस सिलेंडर डिलीव्हरी करणारे कर्मचारी ग्राहकांकडुन अतिरिक्त रुपयाची मागणी करत असल्याचे निदर्शनात आले असल्याचे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्यांनी बैठकीत सांगितले आहे. त्यानुसार गॅस डिलीव्हरी करणारे गॅस एजन्सीचे कर्मचारी किंवा खाजगी व्यक्ती नोकरदार हे ग्राहकांकडून अतिरिक्त रुपयाची मागणी करीत

पान २ वर



# संपादकीय पान

## फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो त्यात दिवाळी या सणाला विशेष महत्व आहे. दिवाळी सणाला सणांचा राजा म्हंटले जाते कारण दिवाळी हा एकमेव असा सण आहे जो पाच दिवस चालतो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचाच आवडीचा हा सण आहे. या सणाचा उत्साह काही औरच असतो. या सणाइतका आनंद दुसऱ्या कोणत्याच सणात नसतो. दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र - मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच फटाके उडवतात. वास्तविक दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, फटाक्यांचा नाही तरीही दिवाळीत फटाक्यांना अवास्तव महत्व दिले जाते. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आव्हान सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अर्थात काही लोक त्यांच्या आव्हानास प्रतिसाद देतात मात्र त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. फटाक्यांचे समर्थन करणारे नेहमी म्हणत असतात की दिवाळीतच फटाके न वाजवण्याचे आव्हान का केले जाते ? याचे कारण असे आहे की दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात. दिवाळी इतके फटाके इतर कोणत्याही वेळी वाजवले जात नाही. अधिक फटाके वाजवल्याने त्याचे दुष्परिणाम ही अधिक होतात. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे प्रदूषण वाढते. आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई - दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कॅडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. लेड मज्जासंस्थेवर परिणाम करते. कॅडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. सल्फरमुळे वनस्पतींची वाढ खुंटते. सल्फरमुळे झाडांच्या फळावर अनिष्ट परिणाम होतो. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळ्या बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. मानवी आणि सजीव सृष्टीवर परिणाम करणारे हानिकारक फटाके दूर ठेवून आपण दिवाळी साजरी केली तर वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील. चला तर मग फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या! फटाके दूर करून हा आनंदाचा सण साजरा करू या!!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### गॅस सिलेंडर ...

असल्यास संबंधितांवर गॅस एजन्सीमार्फत कारवाई करण्यात यावी. तसेच गॅसधारक लाभार्थी यांनी कुणालाही अतिरिक्त पैसे देवू नये. तसेच गॅस सिलेंडर डिलीव्हरी काम करणाऱ्यांनी देखील ग्राहकांकडून अतिरिक्त पैशाची मागणी करु नये. अन्यथा अशी बाब निदर्शनास आल्यास संबंधित गॅस एजन्सीमार्फत कारवाई करण्यात येईल अशा सूचना जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिल्या आहेत.

## राधाकृष्ण विखे यांनी सन्मानाने उपसमितिची बैठक बोलावून चर्चेला बोलवावे वा परिणामाला तयार राहावे - डॉ संजय लाखे पाटील

**जालना । प्रतिनिधी** - छत्रपती संभाजी नगर येथे एका पंचतारांकित हॉटेलमध्ये थांबलेले मराठा आरक्षण विषयक मंत्रीमंडळाच्या उपसमितीचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना मराठा तरुणांच्या रास्त रोषाला सामोरे जावे लागले परंतु यासाठी त्यांनी त्या मराठा तरुणांची पोलिसी छाडाछडती करवली तसेच ते स्वतः पोलिसांच्या सुरक्षीत कड्या आड लपून पोलिसांच्या आडूनच त्या तरुणांशी उभ्या उभ्याच असभ्यपणे चर्चा करत होते, जी निषेधार्ह आहे अशी खरमरीत टिका मराठा क्रांती मोर्चाचे मुख्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी केली असून, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या गोलमेज परिषदेनंतर मराठा समाजातील कार्यरत विविध सामाजिक संघटना, विधीज्ञ, अभ्यासक, समन्वयक, याचिकाकर्ते यांच्याशी उपसमितीची अधिकृत चर्चा घडवून आणत दि. ०२ सप्टेंबरच्या शासन आदेशाने मराठ्यांना कसे आरक्षण मिळणार आहे? मराठा समाज आरक्षणास कसा पात्र होणार आहे? हैदराबाद गॅझेट नेमकं कसे लागू होऊन उपयोगी आहे आणि त्यासाठी नेमकी मार्गदर्शक 'मानक कार्यपद्धती'(एसओपी) राज्य सरकार कधी जाहीर करणार आहे या आणि मराठा समाजाच्या इतर महत्त्वाच्या विषयावर चर्चा करावी असे जाहीर आवाहन करून तसे इमेल सुध्दा विखेपाटील यांना पाठवले होते. परंतु महिना उलटून गेला तरी अद्याप त्यांचा प्रतिसाद नाही हे अतिशय संतापजनक आहे आणि यांचे परिणाम ना. विखेपाटील यांना आगामी काळात संपूर्ण मराठवाड्यात भोगावे लागतील आणि त्याची सुरुवात छत्रपती संभाजीनगर मधून आक्रमक मराठा युवकांनी केली असून याचे पर्यवसान पुढील काळात 'खळ्ळखट्याळ' मधे झाले तर ती जबाबदारी वैयक्तिक ना. राधाकृष्ण विखे पाटील यांची असेल असेही डॉ. संजय लाखेपाटील यांनी सांगितले आहे! आणि मराठा समाजाच्या आरक्षणासाठी दि ०२ सप्टेंबर शासन आदेशासह इतरही गंभीर विषयावर चर्चेसाठी उपसमितिची बैठक आयोजित



करून आम्हाला तातडीने चर्चेसाठी बोलवावं असेही आवाहन डॉ संजय लाखेपाटील यांनी केले आहे! तसेच विशेषतः संपूर्ण मराठवाडा, व अहिल्यानगर, नाशिक सह संपुर्ण महाराष्ट्र हा अतिशय गंभीर ओल्या दुष्काळाचा सामना करत असतांना अद्याप शासकीय मदत नाही त्यामुळे अस्मानी आणि सुलतानी संकटाने शेतकरी, शेतमजूर,लहान उद्योजक, कारागीर, पशुपालक यांना काळ्या दिवाळीला सामोरे जावे लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर असंवेदनशील ना. राधाकृष्ण विखे पाटील हे पंचतारांकित हॉटेलमध्ये पाहुणचार झोडत आहेत हे महाराष्ट्रासारख्या संवेदनशील राज्यात संवेदना गोठल्याचे निदर्शक असून म्हणून अतिशय संतापजनक असल्याचेही डॉ. संजय लाखेपाटील यांनी घणाघाती टिका करतांना सांगितले आहे!

## धनत्रयोदशी आणि धन्वंतरि जयंतीचे महत्त्व

आश्विन वद्य त्रयोदशी या तिथीला धनत्रयोदशी (धनतेरस) हा सण साजरा केला जातो. दीपावलीला जोडून येणार्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुर्वणालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारीवर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. धनत्रयोदशी म्हणजेच देवतांचा वैद्य 'धन्वंतरी देवता' यांची जयंती. या दिनाचे माहात्म्य या लेखातून जाणून घेऊया.

भावार्थ : 'ज्यामुळे आपल्या जीवनाचे पोषण सुरळीत चालू आहे, त्या धनाची या दिवशी पूजन करतात. येथे 'धन' म्हणजे शुद्ध लक्ष्मी. श्रीसूक्तात वसू, जल, वायू, अग्नी आणि सूर्य यांना धनच म्हटले आहे. ज्या धनाला खरा अर्थ आहे, तीच खरी लक्ष्मी ! अन्यथा अलक्ष्मीमुळे अनर्थ घडतो.

वैशिष्ट्ये : हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते. या दिवशी ब्रह्मांडात श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व प्रक्षेपित होत असते. त्यामुळे जिवाला श्री लक्ष्मीदेवी आणि नारायण यांची कृपा संपादन करता येते. ती कृपा जिवाच्या भावावर टिकून राहाते. आताच्या काळात साधकांना शक्तीची आवश्यकता आहे, तसेच व्यावहारिक सुखापेक्षा जगणे आणि आयुष्य टिकवणे महत्वाचे आहे. त्यामुळे साधना करणार्या जिवासाठी हा दिवस




'महापर्वणी' समजला जातो. साधनेसाठी अनुकूलता आणि ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठी या दिवशी धनलक्ष्मीची पूजा करतात. वर्षभर योग्य मार्गाने धन कमवून वार्षिक उत्पन्नाचा १/६ भाग धर्मकार्यासाठी अर्पण करावा.

महत्त्व : या दिवसाला बोलीभाषेत 'धनतेरस' असे म्हटले जाते. या दिवशी व्यापारी तिजोरीचे पूजन करतात. व्यापारी वर्ष दिवाळी ते दिवाळी असे असते. नव्या वर्षाच्या हिशोबाच्या वह्या या दिवशीच आणून त्यांचे पूजन करून वापरात आणल्या जातात.

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन सुवर्ण विकत घेण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वर्षभर घरात धनलक्ष्मी वास करते. वास्तविक लक्ष्मीपूजनाच्या वेळी वर्षभराचा आयव्यय (जमाखर्च) द्यायचा असतो. त्या वेळी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेली संपत्ती प्रभुकार्यासाठी व्यय केल्यास सत्कार्यात धन व्यय झाल्यामुळे धनलक्ष्मी शेवटपर्यंत लक्ष्मीरूपाने रहाते. धन म्हणजे पैसा. हा पैसा घामाचा, कष्टाचा, धवलांकित असलेला आणि वर्षभरात पै-पै करून जमा केलेला असावा. या पैशाचा न्यूनतम १/६ भाग प्रभुकार्यासाठी व्यय करावा, असे शास्त्र सांगते.' - परात्पर गुरु पांडे महाराज

पूर्वी राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्री दान करून खाली करायचे. तेव्हा त्यांना धन्यता वाटायची. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा आहे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता देत असे. त्यामुळे साहजिकच परत खजिना भरत असे. 'सत्कार्यासाठी धनाचा विनियोग झाल्यामुळे आत्मबलही वाढत असे.

**धन्वंतरि जयंती**

धन्वंतरि जन्म : 'धन्वंतरीचा जन्म देव आणि राक्षस यांनी केलेल्या समुद्रमंथनातून झाला. चार हात असलेला भगवान धन्वंतरि एका हातात 'अमृत कलश', दुसर्या हातात 'जळू', तिसर्या हातात 'शंख' आणि चौथ्या हातात 'चक्र' घेऊन जन्माला आला. (समुद्रमंथनातून बाहेर आला.) या चारही हातांतील गोष्टींचा उपयोग करून अनेक व्याधींना, रोगांना बरे करण्याचे काम भगवान धन्वंतरि करतो.' - आधुनिक वैद्य श्री. राम लाडे

वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे आणि साखर असे 'प्रसाद' म्हणून लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे. कडुनिंबाची उत्पत्ती अमृतापासून झाली आहे. धन्वंतरि हा अमृततत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. कडुनिंबाची पाच-सहा पाने प्रतिदिन खाल्ली, तर व्याधी होण्याची शक्यता नाही. एवढे कडुनिंबाचे महत्त्व आहे; म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

यमदीपदान : प्राण हरण करण्याचे काम यमराजाकडे आहे. मृत्यू कोणालाच चुकला नाही आणि चुकवता येत नाही; पण अकाली मृत्यू कोणालाच येऊ नये, याकरिता धनत्रयोदशीस यमधर्माच्या उद्देशाने कणकेचा तेलाचा दिवा (तेरा दिवे) करून तो घराच्या बाहेरच्या बाजूस दक्षिणेला तोंड करून सायंकाळी लावावा. एरव्ही दिव्याचे तोंड दक्षिणेस कधीही नसते, केवळ या दिवशी तेवढे दिव्याचे तोंड दक्षिणेस करून ठेवावे. त्यानंतर पुढील मंत्राने प्रार्थना करावी.

मृत्युना पाशदंडाभ्यां कालेन श्यामयासह ।
त्रयोदश्यांदिपदानात् सूर्यजः प्रीयतां मम ||

अर्थ : धनत्रयोदशीला यमाला केलेल्या दिव्याच्या दानाने प्रसन्न होऊन त्याने मृत्यूपाश आणि दंडातून माझी सुटका करावी.

यमदीपदान सूर्यास्तानंतर करणे म्हणजेच साधारणपणे सायंकाळी ६ ते रात्री ८ या वेळेत करणे. याला लाभाच्या दृष्टीने खूप महत्त्व आहे. नंतरचा काळ गौण भाग आहे. गौण भाग जरी असला, तरी त्या वेळेत सुद्धा यमदीपदान करू शकतो.

'धनत्रयोदशीला श्री लक्ष्मीतत्व पृथ्वीवर मोठ्या प्रमाणात येते. या दिवशी श्री लक्ष्मीची पूजा करतांना सध्या लोक पैसे (नाणी, नोटा), दागिने या स्वरूपात करतात. या कारणाने श्री लक्ष्मीची कृपा खर्या अर्थाने त्यांना प्राप्त होत नाही. केवळ स्थूल धनाचे पूजन करणारा जीव मायेच्या पाशात अडकतो आणि 'साधना करून मोक्षमिळवणे', हा मनुष्यजन्माचा मूळ उद्देश विसरतो. या दिवशी श्री लक्ष्मीचे ध्यान आणि शास्त्र संमत पद्धतीने पूजन करणे अपेक्षित असते.'

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते' संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**

## मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम; विज्ञान, साधेपणा आणि प्रेरणेचा दीपस्तंभ

अवुल पाकीर जैनुलाब्दिन तथा ए.पी.जे अब्दुल कलाम (१५ ऑक्टोबर १९३१ - २७ जुलै २०१५) हे एक भारतीय एरोस्पेस शास्त्रज्ञ होते. तसेच त्यांनी २००२ ते २००७ या काळात भारताचे ११वे राष्ट्रपती म्हणून देखील काम केले होते. कलाम हे तामिळनाडूच्या रामेश्वरम येथे वाढले होते, आणि तेथेच त्यांनी भौतिकशास्त्र आणि एरोस्पेस अभियांत्रिकीचा अभ्यास केला. त्यांनी पुढील चार दशके शास्त्रज्ञ आणि विज्ञान प्रशासक म्हणून, प्रामुख्याने संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (ऊ्ठऊज) आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था (खडठज) येथे काम केले.भारताच्या नागरी अंतराळ कार्यक्रमात आणि लष्करी क्षेपणास्त्र विकासाच्या प्रयत्नांमध्ये त्यांचा खूप मोठा सहभाग होता. अशा प्रकारे बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आणि प्रक्षेपण वाहन तंत्रज्ञानाच्या विकासावर केलेल्या कामामुळे ते भारताचे मिसाइल मॅन म्हणून ओळखले जाऊ लागले. १९९८मध्ये भारताच्या पोखरण-खख अणुचाचण्यांमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण संघटनात्मक, तांत्रिक आणि राजकीय भूमिका बजावली. १९७४मध्ये भारताने केलेल्या मूळ अणुचाचणीनंतर ही पहिलीच चाचणी होती. अब्दुल कलाम यांना 'मिसाइल मॅन' नावानं प्रसिद्ध असलेल्या एपीजे अब्दुल कलाम यांना भारतरत्न पुरस्कारानं गौरवण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यापूर्वी केवळ १९५२ मध्ये सी. व्ही. रमण वगळता इतर कोणत्याही शास्त्रज्ञाला या पुरस्कारानं गौरवण्यात आलं नव्हतं.

१ मार्च, १९९८ रोजी राष्ट्रपती भवनात भारतरत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात कलाम काहीसे नर्व्हस होते. त्यामुळं ते त्यांच्या निळ्या टायला पुन्हा-पुन्हा हात लावत होते. कलाम यांना अशा कार्यक्रमांची चीड यायची. कारण ज्या कपड्यांमध्ये त्यांना अवघडल्यासारखं वाटायचं तेच कपडे त्यांना अशा कार्यक्रमांत परिधान करावे लागायचे. सूट परिधान करणं त्यांना कधीच आवडलं नाही. एवढंच काय पण लेदर शूजऐवजी नेहमी स्पोर्ट्स शू परिधान करणंच त्यांना आवडायचं.कलामांनी लिहिलेली पुस्तके-

अदम्य जिद्द (मराठी अनुवाद : सुप्रिया वकील)

इग्नायटेड माइंड्स: अनलीशिंग द पॉवर विदिन इंडिया ('प्रज्वलित मने' या नावाचा मराठी अनुवाद, अनुवादक : चंद्रशेखर मुरगुडकर)

'इंडिया २०२०- ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम' (इंग्रजी, सहलेखक अब्दुल कलाम आणि वाय.एस. राजन); 'भारत २०२०: नव्या सहस्रकाचा भविष्यवेध' या नावाने मराठी अनुवाद : अभय सदावर्ते)

इंडिया - माय-ड्रीम

उन्नयन (ट्रान्सेन्डन्सचा मराठी अनुवाद, सकाळ प्रकाशन)

एनव्हिजनिंग न एम्पॉवर्ड नेशन : फॉर सोसायटल ट्रान्सफॉरमेशन

विंग्ज ऑफ फायर (आत्मचरित्र). मराठीत अग्निपंख नावाने अनुवाद, अनुवादक : माधुरी शानभाग.

सायंटिस्ट टू प्रेसिडेंट (आत्मकथन)

टर्निंग पॉइंट्स (याच नावाचा मराठी अनुवाद : अंजनी नरवणे)

टार्गेट ३ मिलियन (सहलेखक - सृजनपालसिंग)

ट्रान्सेन्डन्स : माय स्पिरिचुअल एक्सपिरिअन्सेस विथ प्रमुखस्वामीजी (सहलेखक - अरुण तिवारी)

दीपस्तंभ (सहलेखक : अरुण तिवारी; मराठी अनुवाद कमलेश वालावलकर)

परिवर्तनाचा जाहीरनामा (मूळ इंग्रजी-अ मॅनिफेस्टो फॉर चेंज) सहलेखक - व्ही. पोतराज, मराठी अनुवाद - अशोक पाध्ये)

ए.पी.जे. अब्दुल कलाम : संपूर्ण जीवन (अरुण तिवारी).

बियाँण्ड २०१० : अ व्हिजन फॉर टुमॉरोज इंडिया (सहलेखक वाय.एस. राजन, मराठी अनुवाद-सकाळ प्रकाशन)

महानतेच्या दिशेने : एकत्र येऊया बदल घडवू या (मॅजेस्टिक प्रकाशन)

स्क्वेअरिंग द सर्कल सेवन स्टेप्स टू इंडियन रेनेसांस ( सहलेखक - अरुण तिवारी. मराठी अनुवाद : सेवन स्टेप्स टू इंडियन रेनेसांस - भारतीय प्रबोधनपर्व - वैभवशाली भारताची आगामी दिशा. अनुवादक : संजय माळी, बुकगंगा पब्लिकेशन्स )

अब्दुल कलाम यांचे सदर पुस्तक अत्यंत महत्त्वाचे आहे व त्यातून खूप काही शिकण्यासारखे आहे.

**संग्रहक**
**चित्रकार संतोष औटी**



# टेंभुर्णी पोलीसांची धडाकेबाज कारवाई

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी** - येथील पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैद्य दारू विक्री करणारा इसमांवर ०२ रेड करण्यात आल्या.
इसम नामे सुरेश हरिभाऊ गवई वय ५७ वर्ष रा. अकोला देव तालुका जाफराबाद याचे ताब्यातून अवैध देशी दारूच्या २० बाटल्या किंमती अंदाजे २000/- हजार रुपये तसेच इसम नामे - १) अंकुश काळुजी पांडव वय ३६ वर्षे २) संजय भगवान पांडव वय ४१वर्षे दोन्ही राहणार बुटखेडा यांच्या ताब्यातून २० देशी दारूच्या बाटल्या किमती अंदाजे २000/- हजार रुपये व हिरो स्प्लेंडर प्लस मोटरसायकल किंमत अंदाजे ६0 हजार रुपये असा एकूण ६४000 हजार रु. मुद्देमाल जप्त करण्यात आली सदरची कार्यवाही ही पोलीस निरीक्षक श्री कैलास भारती साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि बाबासाहेब खार्डे पोहेकॉ/ राजू डोईफोडे पोकॉ/ निवृत्ती सोनवणे, पोका/ गंगाधर खरात, पोका /ज्ञानेश्वर ठाकरे पोकॉ/ विशाल भाग्यवंत चा पोकॉ/ लक्ष्मण वाघ यांनी केली



## प्रियदर्शनी कॉलनीत सिमेंट रोड चे भूमिपूजन

# प्रभागाचा विकास जनतेच्या विश्वासातून - भास्कर दानवे



**जालना । प्रतिनिधी** - जालना संभाजीनगर परिसरातील प्रियदर्शनी कॉलनीतील नागरिकांची दीर्घकाळची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. आज (दि. १७ ऑक्टोबर) रोजी विजू भदणेकर यांच्या घरापासून ते शांतीलाल हरदेकर यांच्या घरापर्यंतच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन भारतीय जनता पार्टीचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.
या कार्यक्रमास नगरसेवक जिवन सले, भाजपा सरचिटणीस सुनिल पवार, चिटणीस सुभाष (मामा) सले, कल्याण भदणेकर, रोहित नलावडे, आकाश नखनव, गोविंद पवार, गणेश मालोदे, डॉ. भोंडवणे सर, महेश भोसले, आकाश नखनव यांच्यासह प्रभागातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
भास्कर दानवे म्हणाले भाजप सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रत्येक प्रभागाचा सर्वांगीण विकास हा आमचा ध्यास असून, हा रस्ता काम जनतेच्या विश्वासातून साकार होत आहे.
या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील वाहतूक सुलभ होईल, पावसाळ्यातील चिखल व अडथळ्यांपासून नागरिकांना दिलासा मिळेल.

# जिल्हास्तरीय शालेय कराटे स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डू च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा शालेय कराटे स्पर्धा घेण्यात आली.
या स्पर्धेत जिल्ह्यातून १७५ पेक्षा जास्त कराटे खेळाडू मुले व मुली यांचा सहभाग होता.
या स्पर्धेत जालना जिल्हा शाईन कराटे-डू च्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली व आपले स्थान निश्चित केले जालना जिल्हा शाईन कराटे-डु चे यशस्वी खेळाडू
प्रथम क्रमांक आलेले खेळाडू कु.दिव्यता कोठारी, श्री. म. स्था जैन इंग्लिश स्कूल,जालना वय गट अंडर -१७,वजन गट ६0किग्र,. शेलम ोन गुडेकर जे ई एस कॉलेज,जालना वय गट अंडर -१९,वजन गट -५0 किलो. कु. तनवी खरटमल नारायणा ई-टेक्नो स्कूल, जालना वय अंडर -१९, वजन गट -३६किलो. कु.अश्विनी आजगे श्री गणपती माध्यमिक, व उच्य माध्यमिक विद्यालय,जालना वय गट अंडर -१९, वजन गट -४४किलो, कु.तेजल भागडे जे ई एस कॉलेज,जालना वय अंडर -१९, वजन गट -६४किलो कु.पूर्वा माने श्रीमती इंदिरा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,राम नगर, जालना वय गट अंडर -१९, वजन गट -६८किलो या सर्वांची विभागस्तरीय शालेय किक-बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली
द्वितीय क्रमांक आलेले खेळाडूंमध्ये प्रद्युम्न मालपाणी, नारायणा ई -टेक्नो स्कूल,जालना या गट अंडर -१४ शळसहीं +शहांसह ओंकार गुट्टे नवयुवक गणेश विद्यालय ,जालना वय अंडर -१७, वजन गट -५४किलो कु. वैष्णवी लोखंडेद्दार इंटरनॅशनल स्कूल, जालना वय गट अंडर -१७ वजन गट -४८किलो, कु.आरुषी वलकट्टी नारायणा ई टेक्नो स्कूल,जालना वय गटअंडर -१९, वजन गट -५२किलो तृतीय क्रमांक आलेले खेळाडूंमध्ये कु.वैष्णवी लुटे आर एच व्ही स्कूल, जालना वय गट अंडर -१७,वजनगट -५२केलो कु.लावण्या गुडला , जे ई एस कॉलेज , जालना वय गट अंडर -१९, वजन गट -४८किलो जॉईंट तृतीय क्रमांक आलेले विद्यार्थी कु. सौम्या राणा नारायणा ई टेक्नो स्कूल,जालना वय गट अंडर -१४,वजन गट -३८वर्षे ) यशवर्धन चिल्का श्री. म. स्था जैन इंग्लिश स्कूल , जालना वय अंडर -१४, वजन गट -४0ज्ञस
या सर्व विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र पारचा व सेन्साई अमन पारचा यांचे मोलाचे म र्गदर्शन लाभले
श्री महावीरजी ढक्का, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री संजयजी गाढवे , क्रीडा अधिकारी श्री सिद्धार्थ जी कदम, क्रीडा अधिकारी श्री आशिष जी जोगदंड,श्री राजेश जी राऊत, श्री संजयजी भगत,रितेशजी अग्रवाल, ड च् ड जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वान्गोता सर, ड च् डैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल मॅडम, नारायणा ई टेक्नो स्कूल ची मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, नारायणा ई टेक्नो स्कूलचे डीन श्री व्यंकट राजू गुडला,श्री यादवजी बापू सर, प्रशांतजी प्रेमभारती, श्री रितेशजी जयस्वाल, श्री गणेशजी श्रीराम व पालक वर्ग यांनी कौतुक करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जन्म-मृत्यू प्रमाणपत्र शुल्कातील अन्यायकारक वाढ रद्द करण्याची युवक काँग्रेसची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - महानगरपालिकेत जन्म-मृत्यू प्रमाणपत्र ऑनलाइन प्रक्रियेसाठी आकारण्यात येणाऱ्या अवास्तव शुल्क वाढी विरोधात युवक काँग्रेसतर्फे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. गिराम यांना निवेदन देण्यात आले. अन्यायकारक दरवाढ तातडीने रद्द करून नागरिकाभिमुख दर ठरवावेत यासह शहरात सणासुदीच्या पथदिवे, स्वच्छता, नियमित पाणीपुरवठा या नागरी सुविधा पुरविण्याची मागणी करण्यात आली. जालना विधानसभा क्षेत्राचे युवक काँग्रेस अध्यक्ष शेख वसीम शेख लालमिया, शहर अध्यक्ष अतीक खान, माजी नगरसेवक मोहम्मद नजीब, फारूक तुंडीवाले, शेख शकील, आरेफ़ खान, उम्मत बचाव तहरीकचे अध्यक्ष हाजी अब्दुल हमीद, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, सैफ सिद्दीकी, शेख अशफ़ाक, ईमरान खान, अब्दुल रज्जाक, शेख अकबर, अब्दुल जब्बार, सैफ खान यांच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त श्री. गिराम यांच्याकडे केली आहे.

# सतिश साळवे यांच्या प्रयत्ना मुळे ८ वर्षाचा हारवलेला मुलगा परत सूखरूप आपल्या परिवारा ला मिळाला

**विशाल देशमुख**
**जाफ्राबाद** - शहर कृष्णा नगर वार्ड क्रं.३ मधील भरकटलेला ८ वर्षा चा लहान मुलगा सतीश साळवे व त्यांचे मित्र परिवार यांच्या मूळे सुखरूप परत आपल्या घरी पोहचला विराट बावसकर आसे ह्या लहान मुलांचे नाव विराट हा लहान असता नी त्याचे आई वडिल ह्या जगा मधून निघुन गेलेले तर त्याचा संभाळ हा त्याच्या मावशी संगीता लखन गोफने हे करत आहे. ७ दिवसा पासून विराट हा घरातून भरकटला आसल्या मूळे त्याचा पारिवार त्याचा शोध घेत होते. समोर रुपेश हिवाळे यांचा सतीश साळवे यांना रात्री कॉल आला आणि रुपेश ने सतीश साळवे यांना सांगितले सतिश सर एक लहान मुलगा विश्राम ग्रह चिखली रोड जाफ्राबाद ला एकटा रडत बसलेला आहे. आणि खूप घाबरलेला आसल्या मूळे बोलण्याच्या अवस्ते मध्ये दिसत नाही तर आपण ह्या बाळा ची नक्की मदत करायला पाहिजे नेहमी प्रमाणे कोणताही विचार न बाळगत सतीश साळवे व त्यांचे मित्र मंडळ हे त्या लहान मुला जवळ गेले आणि त्या लहान मुलांची अवस्था खूप वाईट होती सतिश साळवे व त्यांचे मित्र परीवार यांनी विराट ला जेवण, पाणी ,पायातील चप्पल , अशी काही आणखी इतर गोष्टी घेऊन दिल्या व नंतर त्याला पोलीस स्टेशन जाफ्राबाद ला आणले आणल्या नंतर पोलीस निरीक्षक सतिश जाधव साहेब यांना सतीश साळवे व रुपेश हिवाळे यांनी घडलेला प्रकार सांगितला गांभीर्य लक्षात येताच जाधव



साहेबांनी जाफ्राबाद पोलीस टीम ला विराट बावसकर बद्दल तातडीने अधिक माहिति गोळा करण्याची सुचाना दील्या अवघ्या १ तासा मध्ये विराट च्या मावाशी संगीता लखन गोफने यांचे पती लखन गोफने यांच्या सोबत संपर्क झाला आणि त्यांना तातडीने पोलीस स्टेशन जाफ्राबाद ला बोलविण्यात आले मावशी आणि मावसा आल्या नंतर विराट मावशी ला बघून त्यांच्या गळ्यात पडला आणि शेवटी विराट ला त्याचा परिवार मिळाला विराट च्या परिवारा कडून व पोलीस स्टेशन जाफ्राबाद कडून सतीश साळवे व रुपेश हिवाळे यांचे खूप कौतुक होत आहे. या संपूर्ण घटना क्रम मध्ये मोलाचे सहकार्य जाफ्राबाद शहराचे पोलीस उपनिरीक्षक पठाडे सर बीट जमादार सानप सर ,बीट जमादार नारायन गीराम सर व कॉन्स्टेबल कमलाकर लक्कस सर व इतरांचे सहकार्य लाभले. विशाल दांडगे यांचे लाभले इतर सहकार्य , रशीद शहा, गजानन तायडे सर,नितेश भाऊ लोखंडे, उमेश दादा इंगळे, शंकर काळे,अशोक ससाणे, निवृत्ती वानखेडे, राहुल पवार , अजय आव्हाड,नितिन काकडे,राहुल खरात, इत्यादी सर्वांचे सहकार्य लाभले आहे.

# दोन सख्या चुलत भावाचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी** - सकाळी शाळेत गेले आणि दुपारी बारा वाजता घरी आले.घरी दप्तर ठेवून गाव जवळील तळ्यात जाण्याचा मोह आवरला नाही आणि खोल पाण्याचा अंदाज न आल्याने या तळ्यात बुडून या दोन्ही सख्या चुलत भावाचा करून अंत झाला.
देऊळगावराजा येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल मधून घरी आल्यावर पोहण्याचा आनंद घेताना लहान विद्यार्थी कुणाल कृष्णा आढे वय १३ वर्ष आणि ओम गणेश आढे वय ११ वर्ष या दोन विद्यार्थी यांचे दुःखद निधन झाले असून या घटने मुळे गावात परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.ही घटना टेंभुर्णी जवळील वाडोना तांडा येथील आहे.
लहान भाऊ पाण्यात बुडत आहे हे पाहून मोठ्या भावाने त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला मात्र तो त्याला वाचवू शकला नाही आणि आपला ही जीव गमावून बसला.
यातील कृष्णा हा घरातील एकमेव मुलगा असून त्याला दोन बहिणी असून आई वडील आणि आजी आजोबा यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून दुसरा भाऊ ओम याला एक भाऊ आणि एक बहीण असून आई वडील काका असा परिवार आहे. झालेल्या या दुःखद घटने बाबत येथील ग्रामीण रुग्णालयात लोकांनी त्यांना पाहण्यासाठी धावपळ करत येथे आलेल्या त्यांना परिवार जणांची सांत्वना केली.
या दोघा विद्यार्थी यांच्या वर दुपारी पांच वाजे च्या जवळपास मोठ्या दुःखाच्या वातावरण नगर अंतिम संस्कार करण्यात आले. या वेळी मोठा जनसमुदाय नातेवाईक उपस्थिती होते.या वेळी ज्या शाळेत ही विद्यार्थी शिकत होते त्यांना शेवटचा निरोप देण्यासाठी त्यांचे शिक्षक ही आले होते त्यांचे ही डोळे या वेळी अश्रुंनी भरून गेले होते चांगले विद्यार्थी गेल्याचे दुःख त्यांचा चेहऱ्यावर दिसत होते.



# जालना जिल्ह्यात अवैध फटाक्यांविरुद्ध संयुक्त मोहीम

## अपर जिल्हादंडाधिकाऱ्यांचे आदेश

**जालना । प्रतिनिधी -** दिपावली उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्यात अवैध फटाक्यांची विक्री थांबवण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी आदेश जारी करत पोलिस, महापालिका, नगर परिषद, जिल्हा परिषद व महसूल विभागाला अवैध फटाका विक्रीविरुद्ध तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

दिवाळी निमित्त विस्फोटक नियमांनुसार केवळ अधिकृत परवाना धारकांनाच फटाक्यांची विक्री करण्याची परवानगी आहे. तरीदेखील शहर व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी विनापरवाना फटाके विकले जात असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. या ठिकाणी कोणतीही सुरक्षा व्यवस्था किंवा आगनिरोधक उपाय नसल्यामुळे अपघाताची शक्यता वाढली असल्याचे हदगल यांनी पत्रात नमूद केले आहे. पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगर परिषद, ग्रामपंचायत) तसेच महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे विशेष संयुक्त पथक तयार करून अवैध फटाका विक्रेत्यांवर दररोज छापे टाकण्याचे व दैनंदिन अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

वर्दळीच्या ठिकाणी किंवा बाजारपेठांमध्ये अवैध फटाका विक्रीमुळे अपघात होऊन जिवीत वा वित्तहानी झाली, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित स्थानिक प्राधिकरणाची राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

जालना, परतूर, अंबड, भोकरदन, घनसावंगी, मंठा, बदनापूर व जाफ्राबाद येथील उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांना या मोहिमेचे सनियंत्रण करून वेळोवेळी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, फक्त परवाना धारकांकडूनच फटाके खरेदी करावेत आणि विनापरवाना विक्रेत्यांची माहिती स्थानिक पोलीस किंवा महसूल अधिकाऱ्यांना द्यावी. सुरक्षिततेच्या दृष्टीने नागरिकांनी फटाके फोडताना अग्निशमन उपाययोजना अवलंबाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# खांडेकर यांच्या चौकशीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांच्या वादग्रस्त कारभाराची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे जालना शहर उपाध्यक्ष तय्यबबापू देशमुख यांनी नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. निवेदनात देशमुख यांनी म्हटले आहे की, खांडेकर यांनी तात्कालिक नगरपरिषद आणि महानगरपालिका कार्यकाळात अनेक भ्रष्टाचार केले असून शहरातील विकासकामे ठप्प झाली आहेत. ऐतिहासिक स्थळांची तोडफोड, कंत्राटदारांकडून घेतलेली लाच, तसेच पिण्याच्या पाण्याबाबत झालेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये संताप आहे. जर प्रामाणिक चौकशी झाली, तर अनेक गैरव्यवहार उघड होऊ शकतात, असा दावा



देशमुख यांनी केला आहे. या संदर्भातील निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनाही देण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट), शहर उपाध्यक्ष तय्यब बापू देशमुख यांनी हे निवेदन दिले आहे.

# दिपावलीनिमित्त पांजरापोळ मैदानावर जय बजरंग फटाका मार्केट मध्ये ५० फटाका दुकाने उभारण्यास परवानगी

## फटाका विक्रीसाठी 'जय बजरंग असोसिएशन'ला प्रशासनाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' जारी

**जालना । प्रतिनिधी -** दिपावली २०२५ च्या पार्श्वभूमीवर जालना शहरातील श्री. गौरक्षण पांजरापोळ मैदान, महेशनगर मार्केट यार्ड रोड येथे एकूण ५० फटाका दुकाने उभारण्यास जालना शहर महानगरपालिकेने तात्पुरते 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) मंजूर केले आहे. ही परवानगी जय बजरंग फटाका असोसिएशनचे अध्यक्ष गेंदालाल राजाराम झुंगे यांना देण्यात आली असून दिनांक २१ ऑक्टोबर २०२५ पर्यंतच वैध राहणार आहे.

**अग्निशमन विभागाची तपासणी व मंजुरीनंतर परवानगी**

सदर परवानगी अग्निशमन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्र (जा.क्र. १११, दिनांक १६/१०/२०२५) व अर्ज दिनांक १८/०९/२०२५ च्या अनुषंगाने देण्यात आली आहे.

मुख्य अग्निशमन अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशांनुसारच दुकाने उभारणी व विक्री प्रक्रिया पार पाडावी, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

महानगरपालिकेच्या परवानगीसह प्रशासनाने १५ अटींचा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्यापैकी काही महत्त्वाच्या अटी पुढीलप्रमाणे आहेत. यात प्रत्येक दुकानामध्ये किमान ३ मीटर अंतर ठेवणे आवश्यक राहील. १२ मीटर रुंदीचा रस्ता फायर ब्रिगेड वाहनांसाठी मोकळा ठेवावा. प्रत्येक दुकानासमोर फायर एक्स्टिंग्विशर, ५०० लिटर पाणी व वाळूच्या बकेट्स ठेवणे अनिवार्य. 'नो स्मोकिंग'चे फलक लावणे आवश्यक. दुकानांचा वापर निवास म्हणून करता येणार नाही. महाराष्ट्र आग प्रतिबंधक जिव संरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ आणि विस्फोटक नियम, २००८ चे तंतोतंत पालन करणे बंधनकारक. पोलिस, जिल्हाधिकारी कार्यालय व गृह विभाग यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक. कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास ना हरकत प्रमाणपत्र तत्काळ रद्द करण्यात येईल.

प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, परवानगी कालावधीपलीकडे दुकान उभारले किंवा ५० पेक्षा अधिक दुकाने लावली गेल्यास ती दुकाने तात्काळ हटवली जातील आणि खर्च असोसिएशनकडून वसूल केला जाईल.

तसेच, कायदा व सुव्यवस्था बिघडल्यास जय बजरंग फटाका असोसिएशनवर कारवाई करण्यात येईल.

दिवाळीच्या सणात फटाक्यांची विक्री व खरेदी करताना नागरिकांनी सुरक्षेचे नियम पाळावेत, तसेच लहान मुलांना वयोवृद्धांच्या उपस्थितीतच फटाके फोडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## होलसेल दरात दर्जेदार फटाक्यांची विक्री सुरू

### दिवाळी साजरी करा उत्साहात, पण जबाबदारीतून, दर्जेदार फटाके घ्या, सुरक्षिततेसह आनंद लुटा! - गेंदालाल झुंगे

दिवाळीचा सण जवळ आला असून, प्रकाश व आनंदाचा उत्सव अधिक रंगतदार करण्यासाठी फटाके हे महत्त्वाचे आकर्षण ठरतात. याच पार्श्वभूमीवर जय बजरंग फटाका असोसिएशनच्या वतीने नागरिकांसाठी होलसेल दरात दर्जेदार फटाक्यांची विक्री सुरू करण्यात आली आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष गेंदालाल झुंगे यांनी माहिती देताना सांगितले की, यंदा आम्ही नागरिकांना चांगल्या दर्जाचे, सुरक्षित आणि मान्यताप्राप्त कंपन्यांचे फटाके कमी दरात उपलब्ध करून देत आहोत. नागरिकांनी महागड्या किरकोळ दुकानांमधून फटाके खरेदी न करता असोसिएशनच्या पन्नास होलसेल दुकानांमधूनच योग्य दरात उपलब्ध फटाके घेऊन लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

झुंगे यांनी पुढे सांगितले की, सर्व फटाके हे सुरक्षा मानकांचे पालन करणाऱ्या नामांकित कंपन्यांचे आहेत. बालक आणि वृद्धांसाठी सुरक्षित अशा फुलबाजे, झिरप्या, लव्हली, रंगीत चक्रे, रॉकेट्स, आकाशबाज यांसह विविध प्रकारचे आकर्षक फटाके विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

त्याचबरोबर ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियमांचे पालन करणाऱ्या फटाक्यांना प्राधान्य दिले असून, ग्राहकांना दर्जेदार माल योग्य किमतीत मिळावा, हा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दिवाळीचा सण जवळ येताच बाजारात फटाक्यांची मागणी वाढली आहे. परंतु काही ठिकाणी अवाजवी दर आकारले जात असल्याने सामान्य ग्राहक अडचणीत येतात. अशा वेळी असोसिएशनच्या माध्यमातून होलसेल दरात उपलब्ध होणारी फटाके विक्री ही नागरिकांसाठी सुवर्णसंधी ठरत आहे.

गेंदालाल झुंगे यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले की, फटाके फोडताना सुरक्षित अंतर ठेवा, लहान मुलांना मोठ्यांच्या देखरेखीखाली फटाके फोडू द्या आणि स्वच्छतेची काळजी घ्या. आपला सण आनंदाचा असावा, अपघातमुक्त असावा, हेच आमचे ध्येय आहे. फटाके विक्री केंद्र शहरातील निर्दिष्ट व अधिकृत जागांवर सुरू असून, दररोज सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत फटाके विक्री केली जाणार आहे.

# अवैध फटाका विक्री विरुद्ध कारवाई आदेश योग्यच; मात्र तितक्याच तत्परतेने प्रतिबंधित गुटखा माफियाकडेही लक्ष देण्याची गरज

**जालना । प्रतिनिधी -** दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अप्पर जिल्हादंडाधिकारी शशीकांत हदगल यांनी अवैध फटाका विक्रीविरुद्ध कडक कारवाईचे आदेश जारी केले आहेत. अवैध फटाके विक्रीवर कारवाई करून दररोजच्या प्रमाणात अहवाल सादर करण्याचे आदेश पोलीस, महानगर पालिका, नगरपालिका व महसूल विभागांना देण्यात आले आहेत. ही तत्परता जर प्रतिदिन जीवघेणा आणि सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका असणाऱ्या प्रतिबंधित गुटखा विक्रीविरुद्ध दाखवली असती, तर हे शहर अधिक सुरक्षित आणि आरोग्यदायी झाले असते. असा संतापजनक आवाज उठत आहे.

अप्पर जिल्हादंडाधिकाऱ्यांनी अवैध फटाका विरोधातील आदेशांचे नागरिकांनी स्वागत केले आहे. मात्र, ही अवैधरित्या होणारी फटाका विक्री केवळ आठ दिवसांचा विषय आहे. प्रतिबंधित गुटखा विक्री विशेषत सतीश उर्फ़ लाला या गुटखा माफियाच्या महिनाभरात ८ ते १० मोठी वाहने भरभरून गुटखा शहरात आणला, साठवला आणि सप्लाय केला जातो. अशा लाला सारख्या व्यापाराविरुद्ध सध्यातरी किरकोळ कारवाईपेक्षा अधिक ठोस कारवाई होतांना दिसून येत नाही.

म्हणूनच, ज्या तत्परतेने अवैध फटाक्यांविरुद्ध रोज अहवाल मागवले जातात, त्याच तत्परतेने गुटखा असंख्य लोकांचे जीव आणि आरोग्य धोक्यात ठेवतो. त्याकडे याच तत्परतेने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

अधिकाऱ्यांनी अवैध फटाका विक्रीवर कडक ताव घेतल्याने दिवाळीच्या काळात सार्वजनिक सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था सांभाळण्याचा प्रयत्न केला आहे. या आदेशांतर्गत, फटाका विक्री ठिकाणांचे तपास, परवानग्यांची पडताळणी व दररोजचा अहवाल मागविणे यांचा समावेश आहे. आदेश देताना दिलेल्या कारणांत सुरक्षा उपाय, अग्निसुरक्षा आणि सार्वजनिक आरोग्य या मुद्द्यांचा निर्देश आहे.

दैनंदिन अहवालाची अंमलबजावणी ही सर्व प्रकारच्या गंभीर अपायकारक अनधिकृत व्यापारांवर उदा. प्रतिबंधित गुटखा यावरही तातडीने केली जावी.

प्रतिबंधीत गुटखा-तंबाखू उत्पादने अनेक ठिकाणी आरोग्यसुरक्षेसाठी निर्बंधाखाली येतात; काही उत्पादनांवर पूर्ण बंदी तर काहीवर विक्रीवर निर्बंध आहेत. जर गुटखा प्रतिबंधित किंवा बॅन्डेड असल्यास, त्याची विक्री, वाहतूक व साठा हे गुन्हा ठरू शकतात. आणि त्या प्रकरणात पोलीस तसेच अन्न व औषध प्रशासन यांची एकत्रित कारवाई अपेक्षित आहे. स्थानिक प्रशासनाला या व्यवसायावरील कठोर तपासणी, सीसीटीव्ही तपासणी, वाहतूक रेकॉर्ड्सची चौकशी व साठा केलेल्या मालावर दंड व जप्ती करण्याचा अधिकार आहेत.

अवैध फटाका कारवाईप्रमाणेच गुटखा विरोधातील दैनंदिन अहवाल पोलीस व अन्न व औषध प्रशासनाकडून मागवावा. सीसीटीव्ही व वाहतूक रेकॉर्डची तपासणी - मोठ्या वाहनांमार्फत येणाऱ्या मालवाहतुकीचे आणि गोडाऊनचे निरीक्षण करावे. सार्वजनिक आरोग्य व जनजागृती मोहीम राबवावी. गुटखा सेवनाचे दुष्परिणाम, स्वतंत्र चेकपोस्ट व पोलीस-प्रशासन एकत्रित मोहीम राबवावी.

ताब्यातील माल जप्त करणे व गुन्हे नोंद करणे, जर नियमभंग आढळले तर तत्काळ कायदेशीर कारवाई करावी. पोलिस व अन्न व औषध प्रशासन यांच्यात समन्वय आवश्यक आहे. दोन्ही विभागांची संयुक्त पथके काढणे आणि त्यांच्याकडून अहवाल सादर करणे. यासारखे आदेश आता अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी द्यावेत.

यात शिथिलता झाली तर लोकांचा विश्वास प्रशासनावरून कमी होऊ शकतो. म्हणूनच स्थानिक प्रशासनाने सामंजस्याने आणि पारदर्शकपणे पुढील तपास व उपाययोजना कराव्यात, असा आग्रह नागरिकांमधून होत आहे.

# सत्यशोधक विद्यालयाच्या खेळाडूंचे गोळाफेक मध्ये यश



**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था छत्रपती संभाजीनगर संचालित सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील विद्यार्थिनींनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यात गोळा फेक तसेच धावण्यामध्ये यश संपादन केले आहे यामध्ये आरती लक्ष्मण दाभाडे वयोगट १७ गोळा फेक प्रथम क्रमांकाने विजयी व जिल्हा स्तरासाठी निवड तसेच राजश्री रामेश्वर श्रीखंडे १९ वयोगट ३००० मीटर धावणे द्वितीय क्रमांकाणे विजयी व जिल्हा स्तरासाठी निवड व २०० मीटर धावणे तृतीय क्रमांकाने विजयी झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य सुनील वाकेकर व संस्थेच्या सचिव जयश्री बनकर यांच्यासह सर्व शिक्षक यांनी पुढील वाटचालीसाठी अभिनंदन केले आहे. या विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षक गोविंद शिंदे, नंदकिशोर मापारी, रामेश्वर खेडकर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.

## अन्न पदार्थांमध्ये भेसळ आढळल्यास माहिती देण्याचे आवाहन

# भेसळयुक्त अन्न पदार्थांची विक्री करणाऱ्याची माहिती देण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** सण आणि उत्सावाच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त अन्नपदार्थाची व्रिक्री होण्याची शक्यता असते. अशा भेसळयुक्त अन्न पदार्थामुळेमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्यांनी बैठकीमध्ये सांगितले आहे. त्यामुळे जिल्ह्यात भेसळयुक्त अन्न पदार्थाची विक्री होणार नाही याकरीता सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासनामार्फत विविध ठिकाणी अचानक भेटी देवून तपासणी करण्यात येणार आहे.



यामध्ये कोणीही व्यक्ती किंवा व्यावसायिक दोषी आढळल्यास संबंधीतावर विद्यामान कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यात कोठेही भेसळयुक्त अन्न पदार्थ विक्री करत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी संबंधीताची माहिती सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांना तात्काळ द्यावी. अशी माहिती देणाऱ्या व्यक्तींची माहिती गोपनीय ठेवण्यात येईल, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

# सत्यशोधक विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** मानव विकास व पूर्णनिर्माण संशोधन संस्था छत्रपती संभाजीनगर संचालित सत्यशोधक विद्यालय गोषेगाव तालुका भोकरदन जिल्हा जालना येथे डॉ अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. ग्रंथालयातील पुस्तकांचा विद्यार्थ्यांनी लाभ घेत सहभाग नोंदविला.कायगाव येथील वर्ग १० वी तील विद्यार्थिनी स्नेहा संतोष खोडके हिला महावाचन निबंध अंतर्गत जिल्ह्यातून मिळालेल्या पुस्तकांचे यात मला आय ए एस व्हायचे, स्त्री कर्तुत्ववान, मीच माझे आयुष्य घडवणार, साजसुधारक माहिती, गणिताची जादू, अग्निपंख, या पुस्तकांचे वाचनही करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संतोष एकनाथ खोडके यांची उपस्थिती लाभली तसेच त्यांचा स्नेहा मुली सोबत त्यांचा सत्कारही करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष सुनील वाकेकर , यासाठी संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्री बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. मोठ्या पदावर कार्यरत व्हायचे स्वप्न बघा आणि ते सत्यात उतरवा अशी आठवण सुनील वाकेकर यांनी करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पर्यवेक्षक इफरोज पठाण हे होते. सूत्रसंचालन निलेश कंकाळ तर आभार श्रीकांत बंगाळे तर वाचनाचे महत्व दिनेश मगरे व दत्तू सुलताने यांनी सांगितले. ग्रंथालय विभागाचे शुभम मोरे तसेच सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.